सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना
दारिद्रय रेषेखालील जोडप्यांना मुलगा नसतांना
त्यांनी एक किंवा दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब
नियोजन शस्त्रक्रिया करुन घेतल्यास त्यांच्या मुली/
मुलींकरिता विशेष प्रोत्साहनात्मक योजना.

# महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - साफुयो- २००४/१५११/प्र.क्र.२९७/कु.क.३
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : २४ एप्रिल,२००७

संदर्भ :- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एनपीसी-१०९४/ प्र.क्र.१६१/कु.क.१, दिनांक - ०७ डिसेंबर, १९९५.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. साफुयो- १०९६/७२७/प्र.क्र. ६५/कु.क.१ दिनांक - १८ सप्टेंबर, १९९६.

३) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. एग्रावि १३९७/प्र.क्र. ४५५/५०, दिनांक - ८ ऑगस्ट, १९९७.

४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. साफुयो- १०९८/२२०/प्र.क्र. ८३/कु.क.४, दिनांक - ४ फेब्रुवारी, १९९९.

५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. लोसंधो-२०००/प्र.क्र. ५७/००/कु.क.१ दिनांक - ९ मे, २०००.

६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. साफुयो- २०००/प्र.क्र.२१०/कु.क.३, दिनांक - १२ ऑक्टोबर, २०००.

७) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण माता बाल संगोपन आणि शालेय आरोग्य, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.राकुकका/लोवमु/ साफुयो योजना/कक्ष ९/०५, दिनांक ४ मार्च २००५.

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र शासनाने स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचाविण्याच्या दृष्टीने कुटुंबात केवळ एक अथवा दोन मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने शासन निर्णय दिनांक ७ डिसेंबर, १९९५ अन्वये सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना दिनांक १ एप्रिल, १९९५ पासून सुरु केली होती. तदनंतर शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, १९९६ अन्वये सदर योजना सुधारित करुन दिनांक १ एप्रिल १९९६ पासून अंमलात आणण्यात आली. त्यानंतर सन २००० मध्ये जाहीर करण्यात आलेल्या राज्य लोकसंख्या धोरणातील निर्णयास अनुसरुन सदर योजना पुन्हा सुधारित करण्यात आली. या योजनेची अंमलबजावणी करतांना काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्या अडचणींवर उपाययोजना करुन या योजनेमध्ये आणखी सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेमध्ये सुधारणा करुन ही योजना दिनांक १ एप्रिल, २००७ पासून खालीलप्रमाणे राबविण्यास शासन मंजूरी देत आहे. सदर योजनेचा लाभ फक्त दारिद्रय रेषेखाली नोंद झालेल्या कुटुंबातील लाभार्थ्यांनाच देय राहील.

**योजनेचे स्वरुप**

२. अ) एका मुलीनंतर शस्त्रक्रिया केल्यास शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तीस रु.२,०००/- रोख व मुलीच्या नांवे रु.८,०००/- राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र स्वरुपात

ब) दोन मुलींनंतर शस्त्रक्रिया केल्यास शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तीस रु.२,०००/- रोख व प्रत्येक मुलीच्या नांवे रु.४,०००/- याप्रमाणे रु.८,०००/- ची राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र स्वरुपात

**योजनेच्या अटी व शर्ती**

३. सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील :-

१) सदर योजनेचा लाभ फक्त महाराष्ट्र राज्यात अधिवासी (Domiciled) कुटुंबानाच देय होईल.

२) लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीमधीलच असावा.

३) पती किंवा पत्नीने केलेली कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया राज्यातील शासन मान्य संस्था अथवा नोंदणीकृत वैद्यकिय व्यवसायिक रुग्णालयात दिनांक १ एप्रिल,२००७ रोजी अथवा तदनंतर केलेली असावी.

४) पती किंवा पत्नीपैकी कोणीही यापूर्वी निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केलेली नसावी.

५) सदर योजनेच्या लाभार्थीना फक्त एक अथवा दोन मुली असाव्यात परंतु मुलगा मात्र नसावा.

वरील अटी व शर्तीची पूर्तता होत नसल्यास असे अर्ज अपात्र समजण्यात यावेत. अशा अर्जदारांना याबाबत १ महिन्याच्या आत कळवावे.

**अर्ज करण्याची पध्दत :-**

४. बृहन्मुंबई क्षेत्रामधील लाभार्थ्यांना विशेष अधिकारी, कुटुंब कल्याण युनिट, बृहन्मुंबई महानगरपालिका एफ/दक्षिण विभागाचे कार्यालय, ३ रा मजला, परळ, मुंबई ४०००१२ यांचेकडे, इतर महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रामधील लाभार्थ्यांना आरोग्य अधिकारी यांचेकडे आणि राज्यातील इतर ठिकाणाच्या लाभार्थ्यांना जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सदर योजनेच्या अर्जाचे नमुने विनामुल्य मिळतील.

एक मुलगी असल्यास त्या मुलीचे वय एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर आणि दोन मुली असल्यास, दुसऱ्या मुलीचे वय १ वर्ष पुर्ण झाल्यानंतर अर्जदारास वरील संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्ज मिळतील व उक्त अर्जात संपूर्ण माहिती भरुन सदर अर्ज खालील कागदपत्रासह वर नमूद केलेल्या संबंधीत अधिकाऱ्यांकडे लाभार्थीने शस्त्रक्रिया केल्यापासून ३ वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

सदर योजनेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे :-

१) प्रपत्र "अ" येथे दिलेल्या विहित नमुन्यात भरलेला अर्ज,

२) शस्त्रक्रिया केल्यासंबंधीचे प्रपत्र "ब" विहित नमुन्यातील वैद्यकिय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र,

३) शिधावाटप पत्रिकेची प्रत,

४) शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दाखला किंवा ग्रामपंचायत, नगरपालिका किंवा महानगरपालिकेने दिलेले जन्माचे प्रमाणपत्र यापैकी कोणत्याही एका प्रमाणपत्राची प्रत.

५) ग्रामीण भागाकरिता गट विकास अधिकारी किंवा तहसिलदार यांनी सदर कुटुंब, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये समाविष्ट असल्याबाबत दिलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत,

६) शहरी भागाकरिता नगरपालिका / महानगरपालिका यांनी सदर कुटुंब, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये समाविष्ट असल्याबाबत दिलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.

**योजनेची कार्यपध्दती**

५. बृहन्मुंबई क्षेत्राकरिता विशेष अधिकारी कुटुंब कल्याण युनिट, बृहन्मुंबई महानगरपालिका एफ / दक्षिण विभागाचे कार्यालय, परळ, मुंबई ४०००१२ यांनी, इतर महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्राकरिता आरोग्य अधिकारी यांनी आणि राज्यातील इतर ठिकाणाकरिता जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अर्जदारांना विना मोबदला अर्ज उपलब्ध करुन द्यावेत. तसेच अर्जदारांनी संपूर्ण तपशीलासह भरुन दिलेले अर्ज कागदपत्रांसह वर नमूद केलेल्या अधिकाऱ्यांनी तीन वर्षाच्या विहीत मुदतीपर्यंत स्वीकारावेत. अर्ज संपूर्ण भरलेला नसल्यास अथवा सर्व प्रमाणपत्रासह नसल्यास अर्ज मिळाल्यापासून एका महिन्यांच्या आत अर्जदारास लेखी कळवावे. अर्जदारांनी अपूर्ण भरलेले अर्ज किंवा आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज सादर केल्यास अशा अर्जदारांना परिपूर्ण अर्ज सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदत द्यावी. अपवादात्मक परिस्थितीतच अधिक मुदत देण्याचे अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना असतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत कोणताही अर्ज सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ प्रलंबित ठेवता येणार नाही.

६. अर्जदाराचा अर्ज परिपूर्ण असल्यास राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रासाठीचा अर्ज संबंधित अधिकारी जवळच्या टपाल कार्यालयाकडे पाठवतील. सदर योजनेमधील गुंतवणूक करतांना कोणताही मध्यस्थ (एजंट) किंवा अन्य अशासकीय व्यक्तीचा सहभाग असणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. सदर संस्थेने दिलेल्या राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राविषयीच्या तपशीलाची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवावी. सदर प्रमाणपत्रे अर्जदाराच्या स्वाक्षऱ्या घेऊन त्यांना देण्यात यावीत.

७. प्रमाणपत्राच्या नोंदवहीत अर्जदाराचे नांव व संपूर्ण पत्ता, लाभार्थीची नांवे व अद्ययावत पूर्ण पत्ते, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या व्यक्तीचा पत्ता, प्रमाणपत्राचे स्वरुप, रक्कम, प्रमाणपत्राचा क्रमांक व अर्जदाराची प्रमाणपत्रे मिळाल्याबाबतची स्वाक्षरी इत्यादी तपशीलाची नोंद करावी. सदर नोंदवही महत्वाचे दस्तऐवज म्हणून जतन करावी.

८. या योजनेंतर्गत प्रत्येक महिन्यात प्राप्त झालेले अर्ज त्यापैकी अपूर्ण व निकाली काढलेल्या अर्जांचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन आणि शालेय आरोग्य, पुणे यांच्याकडे सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, आरोग्य अधिकारी, महानगरपालिका / नगरपालिका व विशेष अधिकारी कुटुंब कल्याण युनिट, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी सादर करणे आवश्यक राहील. सदर योजनेंतर्गत विहित केलेली कालमर्यादा

अनुसरली जाते किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे यांची राहील.

९. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा प्रसिध्दी अधिकारी व जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी यांच्या मदतीने या योजनेस पुरेशी प्रसिध्दी द्यावी.

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, मुख्य अधिकारी अथवा प्रशासक, नगरपालिका आणि आयुक्त, महानगरपालिका यांनी आपल्या कार्यक्षेत्रात या योजनेचे अर्ज पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देण्याची दक्षता घ्यावी.

११. या योजनेखालील तरतुदीच्या संदर्भात अडचण अथवा प्रश्न निर्माण झाल्यास त्याबाबत अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनाकडे संदर्भ करावा. अशा कोणत्याही वादग्रस्त मुद्यांबाबत शासनाने दिलेला निर्णय अंतिम राहील.

१२. सदर योजनेखाली पात्र ठरलेल्या जोडप्यांचे जिल्हा स्तरावर मोठया प्रमाणात प्रसिध्दी देऊन सत्कार करावे. या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / मुख्य अधिकारी अथवा प्रशासक, नगरपालिका/आयुक्त, महानगरपालिका यांनी करावी.

१३. सदर योजनेवरील खर्च, मागणी क्र.आर-३ "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण -०२-समाजकल्याण - १०२ (१) (बी) सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना (२२३५ २३८ ६) " या मुख्य लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा. सदर योजनेसाठी मंजूर केलेली तरतूद खर्च करण्यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५१२/२००६/व्यय-१३, दिनांक २० मे,२००६ व नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६४/२००६/का-१४७२, दिनांक ७ जुलै,२००६ अन्वये मिळालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र.गि.देशमुख)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे सचिव
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव

Hs 573-2a